**ठळक बातम्या**

- ही लोकसभा निवडणूक केवळ सरकार निवडण्यासाठी नाही तर विकसित भारत बनवण्यासाठी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- देशात शासकीय यंत्रणांचा गैरवापर सुरु असल्याचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा इंडिया आघाडीच्या महारॅलीत आरोप

- माजी उपप्रधानमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपतींच्या हस्ते भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

- जागा देण्याबाबत निर्णय होत नसल्यानं महाविकास आघाडीतून बाहेर पडायचा निर्णय घेतल्याचं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांचं स्पष्टिकरण

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सचा सनरायजर्स हैदराबादवर ७ गडी राखून विजय

**<><><><><><>**

ही लोकसभा निवडणूक केवळ सरकार निवडण्यासाठी नाही तर विकसित भारत आणि देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी आहे, असं प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज मेरठ इथं भाजपाच्या प्रचारसभेला संबोधित करत उत्तर प्रदेशात भाजपाच्या प्रचाराला सुरुवात केली, त्यावेळी ते बोलत होते. भारताची अर्थव्यवस्था ११व्या स्थानावर असताना, देशातलं गरीबीचं प्रमाण वाढत होतं, मात्र जेव्हा आपण

पाचव्या स्थानावर पोचलो, तेव्हा देशातले २५ कोटीपेक्षा जास्त लोक गरिबीतून बाहेर आले, आता जेव्हा आपण तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू, तेव्हा गरिबी दूर होईल आणि इथला मध्यमवर्ग भारताच्या विकासाला गती देईल, असं ते म्हणाले.

भारत उत्पादन क्षेत्रात अभूतपूर्व गुंतवणूक करत आहे, आणि तरुणांना प्रत्येक क्षेत्रात अनेक संधी मिळत आहे असं त्यांनी सांगितलं. आज जगभरात भारताची विश्वासार्हता नव्या उंचीवर पोचली असल्याचं ते म्हणाले.

देशाला भ्रष्टाचाऱ्यापासून वाचवण्यासाठी आपण मोठी लढाई लढत आहोत आणि म्हणूनच आज मोठे भ्रष्टाचारी तुरुंगात आहेत, असं त्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षांत अयोध्येत राम मंदिराची उभारणी, वन रँक- वन पेन्शन योजना, त्रिवार तलाक प्रथेविरोधात कठोर कायदा आणि लोकसभा तसंच विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण अशा अशक्य समजल्या जाणाऱ्या अनेक गोष्टी झाल्या असं ते म्हणाले.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये कारभार हाती घेतल्यापासून देशाचा कायापालट केला असं ते म्हणाले.

भाजपनं मेरठ इथून रामायण या गाजलेल्या मालिकेतले कलाकार अरुण गोविल यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><><>**

देशात शासकीय यंत्रणांचा गैरवापर सुरु असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज दिल्लीत रामलीला मैदानावर झालेल्या विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या महारॅलीत बोलत होते. भाजपानं यंत्रणांना हाताशी धरत काँग्रेसची खाती बंद केली, असा आरोप त्यांनी केला.

इंडिया आघाडीच्या सहकाऱ्यांना तुरुंगात टाकलं, इव्हीएम नसेल तर भाजपा १८० जागाही जिंकू शकत नाही, त्यांना संविधान संपवायचं आहे, म्हणूनच ही निवडणूक देश, संविधान आणि प्रत्येकाचा हक्क वाचवण्यासाठी आहे, जर मतदारांनी यासाठी मत दिलं नाही तर हे प्रत्यक्षात घडेल असं ते म्हणाले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे यांनीही या सभेला संबोधित केलं.

ही निवडणुक लढण्यासाठी प्रत्येक पक्षाला एकसमान वातावरण आणि परिस्थिती उपलब्ध नसल्याचा आरोप त्यांनी केला.

शरद पवार, उद्धव ठाकरे, तेजस्वी यादव, अखिलेश यादव, फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती, चंपाई सोरेन, सीताराम येचुरी, डी. राजा, डेरेक ओ ब्रायन यांच्यासह इंडिया आघाडीचा भाग असलेले अनेक नेते या रॅलीत सहभागी झाले होते. अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन यांच्या अटकेचा या सभेत निषेध केला गेला.

केजरीवाल आणि सोरेन यांची अटक हा संविधानावर हल्ला असल्याची टीका शरद पवार यांनी केली. संविधानाविरोधातल्या शक्तींना रोखण्यासाठी मतदारांनी भाजपच्या विरोधात मतदान करावं असं आवाहन त्यांनी केलं.

याआधी आपला देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत असल्याची शंका वाटत होती पण आता ही शंका वास्तवात उतरली आहे, एक व्यक्ती आणि एका पक्षाचं सरकार देशासाठी धोकादायक आहे, त्यामुळे हे सरकार पाडायची वेळ आली असल्याचं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज ज्येष्ठ भाजपा नेते आणि माजी उपप्रधानमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. राष्ट्रपतींनी अडवाणी यांना हा पुरस्कार त्यांच्या निवासस्थानी

जाऊन प्रदान केला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी उपस्थित होते.

<><><><><><>

महाविकास आघाडीत जागावाटपावरून कोणताही पेच नाही, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत इंडिया आघाडीच्या महारॅलीत सहभागी होण्यासाठी आलेले असताना बातमीदारांशी बोलत होते. मुंबईतल्या जागांवरूनही कोणताची वाद नाही, आम्ही विचार करूनच उमेदवार दिले आहेत, आणि जिंकण्याच्या इर्षेनंच लढतो आहोत, असं ते म्हणाले

इंडिया आघाडीची रॅली म्हणजे घराणेशाही वाचवण्यासाठीची रॅली आहे, असा आरोप भाजपानं केला असला तरी भाजपानं सर्व भ्रष्ट लोकांना स्वतःच्या पक्षात आणलं आहे, त्यामुळे तेच खऱ्या अर्थानं भ्रष्टांची घराणेशाही झाले आहेत, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

<><><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा निवडणुकीतल्या परिस्थितीचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत आहे उद्यापासून. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

तेव्हा ऐकायला विसरू नका, उद्यापासून. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात च्या दरम्यान दररोज ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’.

<><><><><><>

महाविकास आघाडीत वंचित बहुजन आघाडीला जागा देण्याबाबत त्यांच्याकडून कोणताही निर्णय होत नव्हता, त्यामुळेच आघाडीतून बाहेर पडायचा निर्णय घेतल्याचं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज स्पष्ट केलं. ते नागपूरमध्ये वार्ताहर परिषदेत बोलत होते. काँग्रेसला ७ जागांवर पाठिंबा देऊ, असं सांगितलं होतं. त्यानुसार कोल्हापूर आणि नागपूर या दोन जागांवर आम्ही त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. उरलेल्या जागांची त्यांच्याकडून यादी येईल, त्यानुसार आम्ही त्यांना पाठिंबा देवू, असं त्यांनी सांगितलं. यावेळी त्यांनी भाजपाच्या राजकारणावरही टीका केली.

**<><><><><><>**

तेलंगणात बीआरएस, अर्थात, भारत राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा आणि माजी मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांचे विश्वासू सहकारी आणि स्टेशन घानपूरचे आमदार कडियाम श्रीहरी यांनी त्यांची मुलगी काव्यासह आज काँग्रेस पक्षात प्रवेश केला. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि अखिल भारतीय काँग्रेस  समितीचे प्रभारी दीपदास मुन्शी यांच्या उपस्थितीत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. श्रीहरी यांनी  तेलुगू देशम पक्षाच्या सरकारमध्ये मंत्री म्हणून, तर BRS सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री म्हणून काम केलं आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीदारम्यान घातपात घडवून आणण्याच्या हेतूनं नक्षलवाद्यांनी गडचिरोली-छत्तीसगड सीमेवर आयोजित केलेलं शिबिर पोलिसांनी उद्ध्वस्त केलं. पेंढरी उपपोलिस ठाण्यापासून १२ किलोमीटर अंतरावरील चुटीनटोला गावाजवळ हे शिबिर होतं.

शनिवारी ३० मार्चला  नक्षल्यांचं शिबिर सुरु असलेल्या परिसरात अतिरिक्त पोलिस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी अभियान

राबविलं. जवळपास अर्धा किलोमीटर उंच टेकडीवर पोलिस पोहताच तेथे नक्षल्यांची छावणी आढळून आली. मात्र, नक्षलवादी तिथून निघून गेले होते. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाहून कॉडेक्स वायर, डिटोनेटर्स, जिलेटिन कांड्या, बॅटऱ्या, वॉकीटॉकी चार्जर इत्यादी साहित्य ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><><>**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे गृहमंत्री अमित शहा हे दोन दिवसांच्या राजस्थान दौऱ्यावर आहेत. राजस्थानमध्ये पुढल्या महिन्यात दोन टप्प्यांमध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी जयपूरमध्ये संघटनात्मक बैठका घेतल्या. शाह यांनी जयपूर इथं पक्षाच्या नेत्यांची बैठक घेतली आणि दौसा, करौली-धोलपूर, नागौर, चुरू आणि झुंझुनू या पाच लोकसभा मतदारसंघांच्या निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला.

**<><><><><><>**

ईस्टर हा सण देशासह जगभरात उत्साहानं साजरा होत आहे. या सणाच्या पूर्वसंध्येला काल मध्यरात्री देशभरातल्या विविध चर्चमध्ये प्रार्थना करण्यात आली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उप-राष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी मुंबईतल्या कांदिवली इथल्या चर्चला भेट देऊन ख्रिस्ती बांधवांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं नरेंद्र मोदी स्टेडिअमवर झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं सनरायजर्स हैदराबादवर ७ गडी राखून विजय मिळवला. सनरायजर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा

निर्णय घेतला आणि निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १६२ धावा केल्या. गुजरात टायटन्सनं१९ षटकातच बरोबरी साधली, आणि शेवटच्या षटकातल्या पहिल्याच चेंडूवर डेविड मिलरनं उत्तुग षटकार ठोकत संघाला विजय मिळवून दिला. त्यानं नाबाद ४४ धावा केल्या. साई सुदर्शननं ४५, तर शुभमन गिलनं ३६ धावा केल्या, विजय शकरनं नाबाद १४ धावांचं योगदान दिलं.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना विशाखापट्टणम इथं, दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ७ षटकात  बिनबाद ७५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

येत्या गुरुवारपर्यंत ईशान्य भारतात पाऊस आणि गडगडाटी वादळाचा वेग कायम राहण्याची शक्यता आहे असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे . अरुणाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि हिमवर्षाव होण्याची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**